नि.फौ.ख.क्र.१००/२०१७
सरकार वि. लक्ष्मीकांत
नि.क्र. २८

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – अतुल रमेशराव समरित,
वय – २५ वर्ष, व्यवसाय – शेती,
राहणार – खात, ता. मौदा ,जिल्हा – नागपूर

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

मी आरोपी लक्ष्मीकांत लांजेवारला ओळखतो. तसेच फिर्यादी गिता कारेमोरे हिला देखील ओळखतो. दिनांक २०.६.२०१८ रोजी पोलीसांनी मला पंचनामाकामी बोलविले नव्हते. माझ्या समोर घटनास्थळ पंचनामा केला नाही. आता मला माझ्या नावाची सही असलेली नोटीस दाखविली सदर नोटीस वर सही माझीच असून त्यातील मजकुर मला माहित नाही. नोटीसला सहीपुरता **निशाणी क्र २९** देण्यात येतो. आता मला नि.क्र.१९ वरील घटणास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. सदर पंचनाम्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहित नाही.

**साक्षीदार सर तपासात सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपास सदृश प्रश्न विचारण्याची परवाणी मागितली परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.१९ व नि.क्र.२९ वरील सहया मी माझ्या गावातच पोलीस ज्या वेळेस आले होते तेव्हा केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व आरोपी एकाच रांगेत राहतात. हे म्हणणे खरे आहे की त्या दोघांच्या घरापासुन रस्ता गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरचा रस्ता गावाच्या मुख्य रस्त्याला जावुन भेटतो. हे म्हणणे खरे आहे की सदरचा रस्ता जेथे जुळतो तेथे गावाचा सार्वजनिक नळ आहे.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की पोलीसांनी तुम्हाला नळ असलेल्या ठिकाणी हजर राहण्यासाठी सांगितल्याने तुम्ही तेथे गेले होते.

उत्तर – पोलीसांनी मला आवाज मारल्याने मी तेथे गेलो होतो व सही करुन आलो होतो.

मला हे माहीत नाही की गिताबाईने ज्या जागी तिला मारहाण झाली होती ती जागा पोलीसांना दाखविल्यावर पोलीसांनी त्याचा घटनास्थळ पंचनामा बनविला होता. हे म्हणणे खरे नाही की सदर पंचनामा वाचुन समजुन मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी सोबत माझे चांगले संबंध असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे ॲड. ए.एस.रेवतकर यांनी नाकारला**

फेरतपास काही नाही. समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक ११.०४.२०२३ (ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा